दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com · संपादक : अजय भांगे · https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी · गुरुवार दि.१९ मार्च २०२६ · 9422660077 · आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ · वर्ष ३ रे · अंक २०१ · पाने ४ · किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi · Thrusday 19 March 2026 · 9422660077 · RNI-MAHMAR / 2023 / 87555 · Year - 3rd · Issue 201 · Pages 4 · Rate 4 Rs




# गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई-मंत्री छगन भुजबळ यांचा इशारा

## राज्यात पुरेसा साठा शिल्लक असल्याची दिली माहिती

### पेट्रोल-डिझेलचा साठा किती?

छगन भुजबळ यांनी माहिती देताना सांगितले की, सद्यस्थितीत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. राज्यात घरगुती गॅस सिलिंडरचा साठा पुरेसा शिल्लक आहे. राज्यात एलपीजीचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी दैनिक उत्पादक ९००० मेट्रिक टनावरून ११००० मेट्रिक टनापर्यंत वाढवण्यात आले आहे. घरगुती गॅस सिलिंडरवर दिल्या जाणाऱ्या अनुदानावर मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेअंतर्गत ७५ लाख ८१ हजार लाभार्थींना प्रत्येक वर्षी ३ घरगुती गॅस सिलिंडरचे मोफत पुनर्भरण करण्यात येते. राज्यात १७ मार्च २०२६ रोजी पेट्रोल-डिझेलचा साठा पुढील प्रमाणे आहे: पेट्रोल १ लाख ९५ हजार ५८९ किलो लिटर, डिझेल ४ लाख ५५ हजार ४६ किलो लिटर. त्यात पेट्रोल डिझेलचा साठा असून सुरळीत वितरण सुरू आहे.

### घरगुती गॅसचा अवैध वापर करणाऱ्यांवर कारवाई

गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने अत्यंत कठोर उपाययोजना केल्या आहेत. दिनांक ८ मार्च २०२६ रोजीच्या पत्राअन्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा स्तरावर दक्षता फिरते पथक स्थापन करून आवश्यक त्या तपासण्या करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. राज्यात त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. घरगुती गॅसचा अवैध वापर करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असे छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे.



**मुंबई । प्रतिनिधी**

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे भारतात उद्भवलेल्या ऊर्जा संकटामुळे एलपीजी गॅसचा मोठा तुटवडा निर्माण झाला असून, नागरिकांना सिलिंडरसाठी ताटकळत रांगा लावाव्या लागत आहेत. या पार्श्वभूमीवर, गॅसचा तुटवडा रोखण्यासाठी सरकारने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून राज्यात कुठेही टंचाई निर्माण होणार नाही, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. या संदर्भात अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत महत्त्वाची माहिती दिली आहे. तसेच गॅस सिलिंडरचा अवैध वापर करण्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे.

विधानसभेत बोलताना छगन भुजबळ म्हणाले, अचानक जी परिस्थिती निर्माण झाली, १५ जी लढाई सुरू झाली, त्याच्या आधी सुद्धा असे वाटत नव्हते की लढाई सुरू होईल आणि तेल साठ्यावर परिणाम होईल. परंतु, लढाई सुरू झाल्यानंतर आपण पाहिले की तिथल्या खाडीतून येणारे जे जहाज आहेत, त्यावर बंदी आली. गल्फ देशातून सुद्धा येणारे तेल बंद झाले. यातून सुद्धा भारत सरकारने मार्ग काढला आहे. रशियामधून तेल सुरू झाले, व्हेनेझुएलामधून सुरू झाले, अजून कुठून कुठून जेवढे तेल लागणार आहे ते मिळवणे सुरू झाले. ३-४ जहाजे आपली आली सुद्धा आहेत. इराणने देखील स्पष्ट केले आहे की आम्ही जहाज आमच्या शत्रूंचे अडवणार आहोत.पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, पूर्ववत परिस्थितीवर यायला थोडा अवधी लागणार हे निश्चित. अनेक ठिकाणी लोक घरात सिलिंडर असून अजून २-४ सिलिंडर आणून ठेवत आहेत. तसेच जे कोणी अवैध पद्धतीने गॅस सिलिंडर आणत आहेत त्यांच्यावर कारवाई देखील केली जात आहे. अनेक ठिकाणी तपासणी सुरू झाली आहे. भारत सरकारने देखील वेळोवेळी सांगितले आहे की एलपीजी, पीएनजी या गॅसचा साठा आमच्याकडे भरपूर आहे, त्याची काळजी करू नका.

### एलपीजीचा पुरवठा फक्त घरगुती वापरासाठी पुरवण्याचे आदेश

निवेदन सादर करताना छगन भुजबळ म्हणाले, पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांचे दर निश्चित करणे या बाबी केंद्र शासनाच्या आखत्यारीत आहेत. राज्य शासन पेट्रोलियम पदार्थांच्या किमती निर्धारित करण्यास अधिकृत नाहीत. तथापि, राज्यातील नागरिकांना अखंड व सुरळीत पुरवठा होण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. केंद्र शासनाचे ९ मार्च २०२६ च्या आदेशान्वये, एलपीजीचा पुरवठा फक्त घरगुती वापरासाठी पुरवण्याचे आदेश तेल कंपन्यांना देण्यात आले आहे. तसेच प्रोपेन, ब्युटेन या सारखे पदार्थ केवळ एलपीजी निर्मितीसाठीच वापरण्याचे देखील आदेश तेल कंपन्यांना दिले आहेत.

### घरगुती व व्यावसायिक सिलिंडरच्या किंमतीत वाढ

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, केंद्र शासनाने मध्य-पूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत ७ मार्च २०२६ पासून घरगुती व व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीमध्ये पुढील प्रमाणे वाढ केली आहे. घरगुती सिलिंडर- ८५२.५० रुपायांवरून ९१२.५० रुपये (६० रुपयांची वाढ) आणि व्यावसायिक सिलिंडर जे आहे ते १७२०.५० रुपायांवरून ११४.५० रुपये वाढ केलेली आहे.

# जयभीम नगर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी रुपचंद कांबळे

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

जयभीम नगर, माजलगाव येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्यासाठी २०२६ सालची उत्सव समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी रुपचंद नाना कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.

समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी बबन शेळके, कोषाध्यक्षपदी चंद्रमणी डोंगरे (सर), सचिवपदी राहुल कांबळे तर देखावा प्रमुख म्हणून विनय पोटभरे यांची निवड करण्यात आली आहे.

याशिवाय सल्लागार मंडळात चंद्रकांत नाना टाकणखार, अविनाश दादा बनसोडे, अशोक



मगर, सुभाष बनसोडे, आकाश जोगदंड, दीपक कसबे, जितेंद्र पोटभरे, मधुकर साळवे, किसन भदर्गे, परमेश्वर हजारे, अशोक डोंगरे, अतुल भदर्गे, बिभीषण सोनवणे, नारायण मगर, सचिन साळवे, दयानंद मगर, स्वप्नील पोळ, रविकिरण टाकणखार, दयानंद सावंत, साजन जाधव, संतोष आठवले, अभिजित साळवे, विशाल टाकणखार, सचिन वैद्य, आकाश टाकणखार, शिवदास टाकणखार, भिकाजी कांबळे, सचिन जाधव, शेषेराव उजगरे, मिलिंद कांबळे, बदाम आठवले, उद्धव मस्के, विष्णू साळवे, शिवाजी खरात, तात्याराव वाघमारे, पवन सावंत, बन्सी सिरसाठ यांचा समावेश आहे.

या उत्सव समितीच्या माध्यमातून यंदाची जयंती विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# राज्यसभेच्या सिंहासनावर खा.रजनीताई विराजमान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या जेष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांना काल राज्यसभेत पिठासिन अधिकारी म्हणून काम करण्याचा बहुमान मिळाला. दिवसभराचे संपुर्ण कामकाज त्यांच्या नियंत्रणात पार पडले.पिठासिन अधिकारी म्हणून त्यांनी प्रभावीपणे काम केले याच सभागृहात काही वर्षापुर्वी खा. रजनीताईंना निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागले होते. अर्थात ही कारवाई काही दिवसातच रद्द करण्यात आली होती. मात्र काल रजनीताईंचा राजयोग पहायला मिळाला. राज्यसभेतील सर्वोच्च अशा सिंहासनावर विराजमान होण्याची संधी त्यांना मिळाली.अशा संधीचे सोने करत त्यांनी ही




जबाबदारी यशस्वीरीत्या पूर्ण केली.

राज्यसभेतील पिठासीन अधिकारी हे पद अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे असते. या पदामुळेच सभागृहातील कामकाज सुरळीत, नियमबद्ध आणि निष्पक्ष पद्धतीने चालते. राज्यसभेचे स्थायी भारताचे उपराष्ट्रपती (हे राज्यसभेचे सभापती असतात) त्यांच्या अनुपस्थितीत उपसभापती किंवा इतर नियुक्त सदस्य पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतात. या पदावरील व्यक्ती सभागृहाचे संचालन चर्चा, प्रश्नोत्तर, विधेयके यांचे नियोजन करत असतात. सदस्यांमध्ये शिस्त राखणे,गोंधळ झाल्यास कारवाई करणे, कार्यपद्धती व नियमांचे योग्य पालन होईल याची खात्री करणे मतदानात बरोबरी झाल्यास निर्णायक मत देणे, निष्पक्षता राखणे, कोणत्याही पक्षाचा पक्षपात न करता काम करणे ही त्यांची जबाबदारी असते. अशा अत्यंत महत्वाच्या पदावर खा. रजनीताई पाटील यांना काम करण्याची संधी काल मिळाली. या उच्च सिंहासनावर विराजमान झालेल्या रजनीताईंना पाहून प्रत्येक मराठी माणसाची मान अभिमानाने उंचावली गेली.

# सण-उत्सव शांततेत साजरे करा; नंदुरबार जिल्हा प्रशासनाचे शांतता समिती बैठकीत आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आगामी गुढीपाडवा, रमजान ईद, श्रीराम नवमी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती यांसारखे महत्त्वाचे सण-उत्सव जिल्ह्यात उत्साहात आणि शांततेत पार पडावेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात जिल्हास्तरीय शांतता समितीची महत्त्वाची बैठक नुकतीच पार पडली.पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस. यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील शांतता व सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्ह्याच्या



विविध भागांतून शांतता समितीचे १०० ते १५० सदस्य, प्रतिष्ठित नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीला पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस. यांच्यासह उपजिल्हाधिकारी धनंजय गोपटे, निवासी उपजिल्हाधिकारी आशा गांगुर्डे, नंदुरबारचे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन, शहादाचे उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार, अक्कलकुव्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये, आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याव्यतिरिक्त जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी देखील उपस्थित होते.

**अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन**


सण-उत्सवांच्या काळात कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या असून, शांतता समितीच्या सदस्यांनी आपापल्या भागात समन्वयाची भूमिका बजावण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.तालुकास्तरावरही अशाच प्रकारच्या शांतता समिती बैठकांचे आयोजन करून सलोख्याचे वातावरण निर्माण करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला.

# ओव्हरटेकचा अट्टहास नडला! ट्रॅव्हलर थेट पुलावर चढली;चांदसैलीचा युवक मृत्यूच्या दाढेतून बचावला

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा-प्रकाशा रस्त्यावरील पिसावर पुलावर आज एक काळजाचा थरकाप उडवणारा अपघात घडला. प्रकाशाकडून तळोद्याकडे येणाऱ्या एका फोर्स ट्रॅव्हलरने (क्र. एम एच १७ सी व्ही ०५४३) ओव्हरटेक करण्याच्या नादात समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, धडक दिल्यानंतर ट्रॅव्हलर थेट पुलाच्या संरक्षक भिंतीवर जाऊन चढली.

या अपघातात दुचाकीस्वार अजय सरावण पावरा (रा. चांदसैली मंदाना) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना शरीरावर ठिकठिकाणी जबर मार लागला असून, त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली.अपघात घडला तेव्हा घटनास्थळी उपस्थित असलेले लाला चव्हाण यांनी विलंब न लावता मदतीचा हात पुढे केला. त्यांनी जखमी अजय पावरा यांना तातडीने प्रकाशा येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, जखम गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी तातडीने



नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.संबंधित फोर्स ट्रॅव्हलरमध्ये पर्यटक प्रवास करत होते. ट्रॅव्हलर पुलाच्या भिंतीवर चढल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता होती, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. ओव्हरटेक करण्याच्या नादात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसत आहे.या घटनेमुळे पुन्हा एकदा बेफाम वाहन चालविणाऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासनाने अशा निष्काळजी चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# संपादकीय

## उंबरठ्या वरील युद्धझळा



इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्ध पश्चिम आशियात सुरू असले, तरी त्यातून निर्माण झालेली आनुषंगिक संकटे गॅसटंचाईमुळे आपल्या स्वयंपाकघरात येऊन ठेपली आहेत. शेअर बाजारात दररोज होत असलेले भूकंप, बंदरांमधील जहाजांमध्ये कुलूपबंद झालेली आयात-निर्यात, तेलाच्या दरांमधील चढउतार आणि स्वयंपाक व औद्योगिक गॅसच्या तुटवड्याने ठिकठिकाणी दिसून येणाऱ्या रांगा- दरवाढ यांचे चटके आता सर्वसामान्यांना बसू लागले आहेत.एकीकडे तेलाचा ओघ आटू लागल्याने आयातीवर आलेला ताण आणि निर्यात रखडल्याने शेतीमाल-फळांसारख्या नाशवंत मालाचे संभाव्य नुकसान होण्याची भीती आहे. विशेषत: द्रवरूप नैसर्गिक वायूचा पुरवठा विस्कळित झाल्याने महाराष्ट्रापासून गुजरातपर्यंत अनेक उद्योगांचे उत्पादनचक्र थंडावत असल्याचे चित्र दिसते आहे. अशा एकाच वेळी मंदी व महागाईच्या दुहेरी कात्रीत सापडण्याची भीती साधार ठरू लागली आहे. रशियन तेलाचा पुरवठा सुरू राहणार असल्याने सध्या तरी भारत सुपात असला, तरी युद्ध लांबल्यास होणाऱ्या जागतिक परिणामांमुळे आपणही जात्यात येण्यास वेळ लागणार नाही, अशी परिस्थिती दिसते. करोना साथीनंतर सावरलेल्या जगाला युद्धज्वरामुळे पुन्हा फटके बसण्याची भीती उभी राहिली आहे.गेल्या काही काळात जगभरात विकासदर मंदावला असला, तरी भारतीय अर्थव्यवस्थेने या काळातही ब्रिटन आणि जपानसारख्या देशांना मागे टाकून मोठी भरारी घेतली होती. मात्र, या वेगाला इराण-अमेरिका आणि इस्रायल युद्धाची नजर लागली, असे म्हणावे लागेल. विशेषत: इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजांची वाहतूक रोखल्याने तेलसंकट उभे राहिले आहे. याचा साहजिक परिणाम म्हणून कतारसारख्या देशाने गॅसचे उत्पादन थांबवले. भारतातील अनेक उद्योगांतील उत्पादनचक्र त्यामुळे थंडावते आहे. छत्रपती संभाजीनगरसारख्या भागातील अभियांत्रिकी कारखान्यांतील उत्पादनांपासून ते गुजरातमधील 'सिरॅमिक' उत्पादन थंडावले असून, हजारो कामगार बेरोजगार होण्याची भीती आहे. तज्ज्ञांच्या मते युद्ध सुरू झाल्यापासून जगभरातील तब्बल १८ कोटी बॅरल इंधनाचा पुरवठा बाधित झाला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या दरांनी शंभरी ओलांडली होती; अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'युद्ध समाप्तीच्या दिशेने' असल्याचे विधान केल्याने तेलाच्या दरवाढीला काहीसा ब्रेक लागला असला, तरी कोणीही स्थैर्याची हमी देऊ शकत नाही. इंधनावर अवलंबून असलेला वाहन उद्योग, रंग उद्योग, टायर, प्लास्टिकसारख्या अनेक क्षेत्रांना फटके बसत आहेत.आखातातून होणारा खतांचाही पुरवठा थांबला आहे आणि केळी, द्राक्षे, कांद्यापासून कलिंगडापर्यंत शेतीमालाची निर्यात रखडल्याने बळीराजा दुहेरी चिंतेत आहे. या अस्थिर परिस्थितीचे फटके पर्यटनालाही बसत आहेत. तेजी-मंदीच्या लाटांवर स्वार होणाऱ्या जगातील शेअर बाजारांमध्ये या अस्थिरतेचे प्रतिबिंब न दिसते तरच नवल! मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक अडीच हजार अंकांनी घसरून नंतर सावरला, तर 'निफ्टी'तही सव्वाचारशे अंकांनी घट झाली. नागरिकांमधील चिंता आणि परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या साठेबाजांना चाप लावण्यासाठी केंद्र सरकारने अत्यावश्यक वस्तू नियंत्रण कायदा (इस्मा) लागू केला असला, तरी अनेक शहरांमध्ये सिलिंडरसाठी लागलेल्या रांगा, या सर्वसामान्यांमधील घबराटीचेच निदर्शक म्हणाव्या लागतील. अशा स्थितीत उपाययोजनांची व्याप्ती वाढणे आवश्यक आहे; त्याप्रमाणेच ऊर्जेबाबत स्वयंपूर्णतेचे लक्ष्य मैलोगणती दूर असले, तरी त्या दिशेने वाटचालीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्याची आणि धोरणात्मक स्वायत्तता राखून ऊर्जापुरवठ्यातील विविधीकरणाची जाणीव या निमित्ताने अधोरेखित होते.युद्धाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी 'भारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे,' अशी देशाची भूमिका स्पष्ट केली; तसेच तणाव कमी करण्यावर भर देऊन या देशांतील भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली. मात्र, त्यातून युद्धविषयक सडेतोड भूमिकेची अपेक्षा पूर्ण न झाल्याने आणि संसदेत चर्चेची संधी न मिळाल्याने विरोधक आक्षेप घेणे साहजिक आहेत. इंधन तुटवडा आणि दरवाढीने जग होरपळत असून गरीब-विकसनशील देशांचे अर्थकारण मोडून पडत आहे. मात्र, 'शांतता आणि सुरक्षिततेसाठी ही किंमत किरकोळ आहे,' ही ट्रम्प महाशयांची दिव्यवाणी त्यांना जगाची किती चाड आहे, हेच दर्शवणारी आहे, एवढे मात्र खरे.

# आमदार डॉ.विजयकुमार गावित यांच्या प्रकृती साठी डॉ.हिनाताई गावित यांचे शनिदेवाला साकडे

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याचे ज्येष्ठ नेतृत्व, माजी आदिवासी विकास मंत्री तथा विद्यमान आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, यासाठी माजी खासदार तथा 'संसद रत्न' डॉ. हिनाताई गावित यांनी शनिदेवाच्या चरणी साकडे घातले आहे. १८ मार्च २०२६ रोजी त्यांनी नंदुरबार तालुक्यातील शनी मंडळ येथे जाऊन विधिवत पूजन केले.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन महिन्यांपूर्वी हृदयविकारामुळे डॉ. विजयकुमार गावित यांच्या प्रकृतीत बिघाड झाला होता. गेल्या काही आठवड्यांपासून त्यांच्यावर मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गावित परिवाराने दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या प्रकृतीत पूर्वीपेक्षा मोठी सुधारणा होत असून ते उपचारांना उत्तम प्रतिसाद देत आहेत. ते लवकरच पूर्णपणे बरे होऊन जनसेवेत रुजू व्हावेत, यासाठी त्यांचे सर्व हितचिंतक आणि कार्यकर्ते प्रतीक्षा करीत आहेत.

याच पार्श्वभूमीवर, डॉ. हिनाताई गावित यांनी आज शनी मंडळ येथील प्रसिद्ध देवस्थान गाठले. तेथे प्रसिद्ध पुरोहित पांढारकर गुरुजी यांच्या मंत्रोच्चारात त्यांनी विधिवत पूजा अर्चा केली. तत्पूर्वी, त्यांनी गुजरात राज्यातील डेडीयापाडा येथील आदिवासींचे कुलदैवत देव मोगरा माता मंदिरातही पारंपरिक पद्धतीने पूजन करून डॉ. विजयकुमार गावित यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली होती. या धार्मिक प्रसंगी शनी महाराज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील, सामाजिक कार्यकर्ते जगदीश पाटील, हिम्मत पाटील, महेंद्र पाटील, भटू धनगर, महेंद्र राजपूत, चिंधू धनगर, प्रकाश भिल, विवेक पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



# ईद निमित्त मीडियातील गरजवंत यांना 'ईद मुबारक किट' वाटप

## राजयोग फाउंडेशन व पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

रमजान ईदच्या पवित्र सणानिमित्त समाजात बंधुभाव, सहकार्य आणि मानवतेचा संदेश देत राजयोग फाउंडेशन आणि पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि सोशल मीडियामध्ये कार्यरत असलेल्या गरजवंत पत्रकार बांधवांना 'ईद मुबारक किट' चे वाटप करण्यात आले.या उपक्रमातून समाजात एकात्मता आणि परस्पर सहकार्याची भावना दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

बीड येथील समर्थ राजयोग च्या मुख्य कार्यालयामध्ये राजयोग फाउंडेशन आणि पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक १८ मार्च २०२६ रोजी दुपारी दोन वाजता ईद मुबारक कीटचे वाटप करण्यात आले. यावेळी राजयोग फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक शुभम धूत, पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्धिकी, डॉ.वैभव



कोठेकर, राजदिप धुत, सागर वाहुळ, मेघराज जगदाळे, सुशांत राऊत, संकेत करवा, वैभव घुमरे, सय्यद ताहेर, राहुल बादाडे, अभिजीत आव्हाड, ओंकार बोबडे राजयोग फाऊंडेशनचे इतर सदस्य यांच्यासह ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते सुदाम चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, नयना भाकरे, जिल्हा उपाध्यक्ष रईस खान, शेख आयुब, संपादक समीर काजी, लोकमतचे शेख वाजेद, रफिक पठाण, शेख तालेब यासह मान्यवर पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकार हे समाजाचे चौथे स्तंभ मानले जातात. अनेक वेळा ते कठीण परिस्थितीत काम करत असतात. अशा पत्रकार बांधवांच्या पाठीशी उभे राहण्याचा आणि त्यांच्या सणाला आनंदाची उधळण करण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे आयोजक राजयोग फाउंडेशनचे अध्यक्ष नगरसेवक शुभम दिलीप धूत यांनी याप्रसंगी सांगितले.

कार्यक्रमा दरम्यान पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी ईदच्या सणाचे महत्त्व सांगत समाजात शांतता, सद्भावना आणि बंधुत्व टिकवण्याचे आवाहन केले. तसेच समाजातील गरजूंना मदतीचा हात देणे हीच खरी सामाजिक सेवा असल्याचेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे पत्रकार बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी आयोजकांच्या या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे कौतुक केले. भविष्यातही अशाच प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.ईदच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला असून सामाजिक एकोपा आणि मानवतेचा संदेश देणारा आदर्श उपक्रम म्हणून याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त भव्यधार्मिक उत्सवाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज येथील श्री स्वामी समर्थ भक्त परिवाराच्या वतीने चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) निमित्ताने श्रीस्वामी समर्थ महाराज प्रकटदिन उत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.हा उत्सव दि.१९ मार्च २०२६ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे.उत्सवाची सुरुवात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सकाळी मूर्ती प्रतिष्ठापना,पाद्य पूजन,लघुरुद्राभिषेक व अलंकार पूजेनं होणार आहे.त्यानंतर श्री स्वामी समर्थ जन्मोत्सवानिमित्त कीर्तन,प्रवचन तसेच भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.दि.२० मार्च रोजी सकाळी ते सायंकाळ पर्यंत विविध धार्मिक विधी व कीर्तन सेवा पार पडणार असून रात्री हरिकीर्तनाचा कार्यक्रम होईल.दि.२१ मार्च रोजी दुपारी महाप्रसादाचे आयोजन





करण्यात आले आहे.दि.२२ मार्च रोजी सकाळी पूजा अर्चा, कीर्तन व संध्याकाळी पालखी सोहळ्याने उत्सवाची सांगता होणार आहे.या धार्मिक सोहळ्यात विविध कीर्तनकार व प्रवचनकार आपली सेवा देणार आहेत.या उत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ढाकेफळ येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह

## ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख व अविनाश महाराज भारती यांचे किर्तन ठरणार मुख्य आकर्षण

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील ढाकेफळ येथे ता.केज जि.बीड येथे मिती चैत्र शु.१गुढीपाडवा दि १९ मार्च रोजी भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व शिव महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहात संपूर्ण मानव जातीला आध्यात्मिक मार्गावर नेण्याचा आणि संत परंपरेचा संदेश देण्याचा उद्देश ठेवण्यात आला असून संत तुकाराम महाराज यांच्या विचारांचा प्रसार करण्या वर विशेष भर देण्यात येणार आहे.सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन,विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन,शिव महापुराण कथा,प्रवचन,हरिपाठ, हरिकीर्तन व हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. शिवमहापुराण कथा ह.भ.प.अशोक (बापू) महाराज थोरात यांच्या प्रभावी वाणीतून सादर केली जाणार आहे.

या सप्ताहाचे मुख्य आकर्षण म्हणून ह.भ.प. अविनाश महाराज भारती यांचे दि.२१ मार्च शनिवारी रोजी सायंकाळी ९ ते ११ या वेळेत जनजागृतीपर किर्तन होणार असून त्यांच्या ओजस्वी सादरीकरणाची भक्तांना मोठी उत्सुकता आहे.

तसेच दुसरे प्रमुख आकर्षण म्हणून प्रसिद्ध विनोदी किर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे दि.२३ मार्च सोमवार सायंकाळी ५ ते ७ या वेळेत समाजप्रबोधनपर किर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या प्रभावी शैलीमुळे भक्तांमध्ये विशेष उत्साह निर्माण होणार आहे.या शिवाय विष्णु महाराज थोरात यांचे दि १९ मार्च रोजी रात्री ९ ते ११,ह.भ.प.सोपान महाराज कन्हेरकर यांचे दि.२० मार्च रोजी रात्री ९ ते ११,ह.भ.प.पांडुरंग महाराज उगले यांचे दि.२२ मार्च रात्री ९ ते ११, ह.भ.प.विलास महाराज गेजगे यांचे दि.२४ मार्च रोजी रात्री ९ ते ११, ह.भ.प.बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांचे दि.२५ मार्च रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत होणार आहे.यांसह अनेक नामवंतकिर्तनकार व प्रवचनकार सप्ताहात सहभागी होणार आहेत.

श्रीराम नवमीच्या दिवशी धर्मगुरू अमृत आश्रम स्वामी महाराज यांचे अमृततुल्य कीर्तन होणार आहे.किर्तनानंतर सार्वजनिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.यासप्ताहात विविध गावांतील हरिजागर, भजन,भारूड,तसेच ज्ञानेश्वरी ग्रंथ पालखी सोहळा आयोजित करण्यात येणार असून मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. सप्ताहाच्या निमित्ताने ज्ञानदान व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी व तरुण मित्र मंडळ, ढाकेफळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेच्या रौप्य महोत्सवानिमित्त विशेष सन्मान सोहळा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठा महासंघ शाखा भिगवण संचलित छत्रपती शिवराय सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने भिगवण पंचक्रोशीतील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्ती तसेच विविध संस्थांवर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा मदनवाडी चौफुला येथील विश्वजीत हॉटेलमध्ये उत्साहात पार पडला.पुणे, अहिल्यानगर व सोलापूर या तीन जिल्ह्यांतील बारामती, दौंड, इंदापूर, कर्जत व करमाळा या तालुक्यांचा केंद्रबिंदू म्हणून भिगवणची ओळख आहे. मत्स्य व्यवसाय, पक्षी पर्यटन आणि विकसित बाजारपेठेमुळे या गावाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा या भिगवणमध्ये सन २००१ पासून कार्यरत असलेल्या मराठा महासंघ शाखेने सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.महासंघाच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेचा यंदा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पंचक्रोशीतील विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या तसेच नव्याने विविध पदांवर निवड झालेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती अण्णासाहेब मोरे-पाटील, इंदापूर पंचायत समितीच्या सदस्या सौ. हेमाताई माडगे व पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या श्रीमती प्रमिलाताई जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी पंचायत समिती, ग्रामपंचायत, बँक, शैक्षणिक, कृषी, क्रीडा व विविध शासकीय पदांवर निवड झालेल्या अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये ड. अजित विघ्ने, जितेंद्र वनवे, संजय भोसले, अशोकभाऊ शिंदे, हनुमंत काजळे, डॉ. सुरेंद्र शिरसाट, सागर दोलताडे, दिपाली निकम, किरण पिसाळ, विष्णुपंत देवकाते, रुपाली वाबळे, शरद वाघ, संगीता कुदळे, विजयकुमार गायकवाड, संजय साळुंखे, आप्पासाहेब मेंगावडे, सचिन गायकवाड, नितीन लोंढे, मेघा शेलार, श्रावणी चौगुले, लहुजी गाढवे, मोहसीन शेख, विशाखा बंडगर, बाळासाहेब ढवळे-पवार, शशीधर शेट्टी, डॉ. वैष्णवी गलांडे, गणेश करे-पाटील, बाळासाहेब बोडके, सुयश शिंदे, पल्लवी मोरे, कार्तिकेय पवार, श्रद्धा भोसले, ओंकार ढवाण, शुभम गायकवाड, विक्रांत राऊत, श्रीकांत गलांडे व रोहिणी कुंभार यांचा समावेश होता.कार्यक्रमास महासंघ व वाचनालयाचे सभासद, मार्गदर्शक तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुणे विभागीय संघटक राजकुमार मस्कर यांनी केले. सूत्रसंचालन सुहास गलांडे व डॉ. संकेत मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हाध्यक्ष ड. पांडुरंग जगताप यांनी मानले.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी नगरपरिषदेला निवेदन; मागण्या न मानल्यास आंदोलनाचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**वरोरा । प्रतिनिधी**

शहरातील विविध मूलभूत समस्यांचे तातडीने निवारण करून नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, या मागणीसाठी नगरपरिषद अध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा छोटूभाई यांनी दिला. शहरातील हजारो नागरिक नियमितपणे कर भरत असूनही त्यांना अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर खालील प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या आहेत. घरगुती कचरा व्यवस्थापनाबाबत दरवर्षी ५० ते ६० लाख रुपये उपभोक्ता कर भरूनही घंटागाडी एक ते दोन दिवसाआड येत असल्याने कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे दररोज घंटागाडी पाठवावी, अन्यथा करात कपात करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच शहरात अनेक महिन्यांपासून कीटकनाशक फवारणी करण्यात आलेली नसल्याने डास व विषारी जंतूंची वाढ होऊन नागरिकांच्या आरोग्यावर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महिन्यातून किमान दोन वेळा फवारणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.शहरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून अनेक नागरिक जखमी झाले आहेत. त्यामुळे तातडीने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशीही मागणी करण्यात आली.उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाई जाणवत असल्याने नियमित पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे, तसेच नदीवर कच्चा बंधारा उभारून पाण्याची उपलब्धता वाढवावी, अशी मागणी निवेदनात नमूद करण्यात आली आहे.शहरातील अनेक गोरगरीब नागरिक अनेक वर्षांपासून राहत असूनही त्यांना जमिनीचे लीज व पट्टे



मिळालेले नाहीत. शासनाच्या नियमानुसार त्यांना लीज व पट्टे मंजूर करावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच प्रधानमंत्री व रमाई घरकुल योजनेअंतर्गत प्रलंबित व नवीन प्रकरणे मार्गी लावून पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. या सर्व मागण्या तातडीने पूर्ण करून नागरिकांना न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला. नगराध्यक्ष अर्चना आशिष ठाकरे व मुख्याधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संबंधित मागण्यांवर लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. यावेळी शेख जैरुदीन छोटूभाई (जिल्हा शांतता समिती सदस्य), माजी सभापती मोसिनभाई पठाण, अनिस शेख, फिरोज शेख, सचिन ढवस, दिलीप बाबू, वसंता पेंदाम, कमल गहूकर, लता मांडवकर, आकाश शेंडे, राजू कासवार, शाहरुख शेख, प्रमोद तावरे, प्रफुल घोडमारे, विठ्ठल धाबेकर, घनश्याम राऊत, वैभव मडवी यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, चंद्रपूर तसेच पोलीस निरीक्षक, वरोरा यांनाही पाठविण्यात आली आहे.

# हाजी हाशमोद्दीन तांबोळी चॅरिटेबल ट्रस्टकडून रमजान ईद निमित्त शेकडो किराणा किटचे वाटप

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

रमजान ईद निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही हाजी हाशमोद्दीन तांबोळी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने गरजूंसाठी किराणा किट व शिरखुर्मा साहित्याचे वाटप करण्यात आले. करमाळा औद्योगिक वसाहतीतील कार्यालयात आयोजित कार्यक्रमात सुमारे ३०० ते ३५० किटचे वितरण करण्यात आले.करमाळा मुस्लिम समाजाचे अध्यक्ष हाजी उस्मानशेठ तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली हाजी अल्ताफशेठ तांबोळी यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू कुटुंबांना रमजान ईद साजरी करण्यास मोठी मदत झाली.यावेळी बोलताना हाजी अल्ताफशेठ तांबोळी म्हणाले की, ट्रस्टच्या वतीने दरवर्षी रमजान ईद, दिवाळी तसेच आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांना अन्नदान केले जाते. समाजसेवा ही निस्वार्थ भावनेने करत असून, जेवढी सेवा करता येईल तेवढी प्रामाणिकपणे करण्याचा आमचा प्रयत्न



आहे,असे त्यांनी सांगितले.
ते पुढे म्हणाले की, राजकारण आणि समाजकारण या वेगळ्या गोष्टी आहेत. निवडणुकीत पराभव झाला असला तरी आम्ही कोणावरही नाराज नाही. परमेश्वराने आम्हाला देणाऱ्यांच्या रांगेत उभे केले आहे, त्यामुळे समाजसेवेत कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. पुढील पिढीही ही सेवा परंपरा कायम ठेवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमास अमीरशेठ तांबोळी, इंदाज वस्ताद, फारुक जमादार, सोहेल पठाण, अझहर शेख, अमीन बेग, मुश्ताक शेख, अफरोज पठाण, अरमान शेख, अनस बागवान, मुख्तार पठाण, सफरोज आतार, शाहरूख पठाण, नईम पठाण, फरहान शेख आदी उपस्थित होते.

# जेऊरमध्ये महिला महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ; २४ वर्षांची परंपरा कायम

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

महिलांसाठी गेल्या २४ वर्षांपासून सुरू असलेल्या या व्यासपीठावर आयोजित प्रत्येक स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन महोत्सवाची भव्यता वाढवावी, असे आवाहन ज्योतीताई नारायण पाटील यांनी केले.
जागतिक महिला दिनाच्या औचित्य साधून करमाळा तालुक्यातील जेऊर येथे महिला महोत्सवाला आजपासून उत्साहात सुरुवात झाली. आमदार नारायण आबा पाटील यांच्या पत्नी ज्योतीताई पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.
दरवर्षीप्रमाणे यंदाही आमदार नारायण आबा पाटील मित्रमंडळ व ग्रामपंचायत जेऊर यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे २४ वे वर्ष असून मागील २३ वर्षांपासून सातत्याने हा उपक्रम राबविला जात आहे.
महोत्सवांतर्गत १७ ते २२ मार्च दरम्यान विविध



स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार (१७ मार्च) रोजी रांगोळी, वक्तृत्व आणि उखाणे स्पर्धा होणार आहेत. बुधवारी (१८ मार्च) अभिनय स्पर्धा व फॅशन शो आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवारी (२० मार्च) फनी गेम्स, रिल स्पर्धा आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार (२१ मार्च) रोजी पाककला व अंताक्षरी स्पर्धा होणार असून त्याच दिवशी जेऊरमधील महिलांच्या सुरेल गायनाचा विशेष कार्यक्रम सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमात मराठी व हिंदी भावगीते तसेच चित्रपट गीतांचा समावेश असून संगीत विशारद खंडागळे बंधू यांची साथ लाभणार आहे.
रविवार (२२ मार्च) रोजी नृत्य स्पर्धा व बक्षीस वितरण समारंभाने महोत्सवाची सांगता होणार आहे. तसेच यंदा आदर्श महिला शेतकरी व आदर्श उद्योजक महिला या दोन पुरस्कारांनी महिलांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती ज्योतीताई पाटील यांनी दिली.या महोत्सवात महिला भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

# देवळीत गुढीपाडवा निमित्त भव्य पाडवा पहाट संगीत सोहळ्याचे आयोजन

## गायक भूषण जाधवांच्या सुरांनी रंगणार पाडवा पहाट

**दैनिक वादळ वार्ता**
**देवळी । प्रतिनिधी**

मराठी नववर्षाच्या आगमनाचा सोहळा देवळी शहरात यंदा विशेष उत्साहात साजरा होणार असून, विश्व हिंदू परिषद प्रेरित बजरंग दल यांच्या वतीने गुढीपाडवा निमित्त भव्य ‘पाडवा पहाट’ संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. १९ मार्च रोजी पहाटे ४.०० वाजता गांधी चौक, देवळी येथे हा बहारदार कार्यक्रम रंगणार आहे.या विशेष सोहळ्यात प्रसिद्ध गायक भूषण जाधव आपल्या दमदार आणि सुमधुर आवाजातून भक्तीगीते व सांगीतिक सादरीकरण सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करणार आहेत. गुढीपाडवा, रामनवमी आणि हनुमान जयंती यांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमामुळे शहरात धार्मिक, सांस्कृतिक आणि उत्सवी वातावरण



निर्माण होणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस यांची उपस्थिती लाभणार असून उद्घाटन राजेश बकाने यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जेष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल, तहसीलदार समर्थ क्षीरसागर, नगराध्यक्ष किरण ठाकरे, ठाणेदार अमोल मंडळकर, जिल्हा बजरंग दल संयोजक महेश राऊत, उपाध्यक्ष एस एम डब्ल्यू इस्पात श्यामसुंदर मुंदडा, नगरपरिषद उपाध्यक्ष राहुल चोपडा, अटल पांडे, दीपक सुमड आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.देवळीकर जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहून हिंदू नववर्षाचे स्वागत भक्ती, संस्कृती आणि संगीताच्या माध्यमातून करावे, असे आवाहन आयोजक मोहन जोशी, दिनेश क्षीरसागर, गजानन महल्ले, गोल्डी बग्गा तसेच बजरंग दल व विश्व हिंदू परिषद देवळीच्या कार्यकर्त्यांनी केले आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांच्या ५ टक्के निधी वितरणासाठी नगरपरिषदेला निवेदन

## मागण्या न मानल्यास ‘भीक मांगो’ आंदोलनाचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**वरोरा । प्रतिनिधी**

शहरातील २८७ दिव्यांग नागरिकांना त्यांच्या हक्काचा अनुदान निधी तातडीने वितरित करावा, या मागणीसाठी नगरपरिषद अध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास ‘भीक मांगो’ व ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा छोटूभाई यांनी दिला.
नगरपरिषदेकडून दरवर्षी शासनाच्या नियमानुसार वार्षिक उत्पन्नाच्या ५ टक्के निधीचा लाभ दिव्यांग लाभार्थ्यांना मार्च महिन्याच्या सुरुवातीला वितरित केला जातो. मात्र, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात १७ मार्च उलटूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने लाभार्थ्यांना अद्याप निधी मिळालेला नाही.



यामुळे शहरातील दिव्यांग नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या हक्काचा निधी ३१ मार्चपूर्वी ३०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना वितरित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. संबंधित निधी देऊन दिव्यांग नागरिकांना सन्मानाने जीवन जगण्यास मदत करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास नगरपरिषद कार्यालयासमोर दिव्यांग नागरिकांसह ‘भीक मांगो’ व ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.नगराध्यक्ष अर्चनाआशिष ठाकरे व मुख्याधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावेळी मागण्यांची पूर्तता लवकरात लवकर करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.
यावेळी शेख जैरुदीन छोटूभाई (जिल्हा शांतता समिती सदस्य), माजी सभापती तथा माजी संचालक बाजार समिती मोहसीन पठाण, दिलीप बाबू, सचिन ढवस, प्रशांत पिपरे, अनिस शेख, शाहरुख शेख, प्रमोद ठावरे, प्रफुल घोडमारे, विशाल रुयारकर, वसंता पेंदाम, काजल गहूकर, जीवनदास सिताराम भगत, लता नंदकिशोर माडेकर, नीलिमा दामोदर करलुके, राजीव तुकाराम कासावार, आकाश संतोष शेंडे यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, चंद्रपूर तसेच पोलीस निरीक्षक, वरोरा यांना पाठविण्यात आली आहे.

# भामरागड ग्रामीण रुग्णालयाला लाभले तज्ञ वैद्यकीय अधिकारी

**दैनिक वादळ वार्ता**
**भामरागड । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्याच्या अंतिम टोकावर असलेल्या भामरागड तालुका मुख्यालयात सुरु असलेल्या ग्रामीण रुग्णालयाची आरोग्य सेवा पूर्णतः कोलमडली होती. या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी समवेत तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याची कमतरता होती. आत्ता मात्र उसणवारी ने का असेना पण तज्ञ वैद्यकीय अधिकारी या ठिकाणी लाभल्याने समाधान व्यक्त केला जातं आहे.महाराष्ट्र राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मागील महिण्यात संपूर्ण गडचिरोली जिल्हा पिंजून काढला होता आणि जिल्ह्यातील दुर्गम भागात सुरु असलेल्या शासकीय आरोग्य संस्थांना भेट देऊन यात सुरु असलेल्या कामाचा आढावा घेतला. दरम्यान जवळपास संपूर्ण जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था कमकुवत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आला. भामरागड तालुक्याला १३ फेब्रुवारी २०२६ ला भेट देऊन संपूर्ण आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेतला आणि



येथील अव्यवस्था बघून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केले होते आणि या व्यवस्थेत सुधारणा न झाल्यास कार्यवाही करण्याचे दमाही त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले होते.
त्यानंतर दुर्गम भागातील रिक्त पदे तातडीने भरण्याच्या उद्देशाने २७ फेब्रुवारी २०२६ ला जाहिरात प्रसिद्ध केले या प्रक्रियेला वेळ लागत असल्याने दुर्गम भागातील आरोग्य यंत्रनेला याचा फटका बसू नये आणि आरोग्य सेवा प्रभावित होऊ नये म्हणुन भामरागड ग्रामीण रुग्णालय येथे पंधरा - पंधरा दिवसांकारिता तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना विशेष आरोग्य सेवा पुरवीण्याकरिता आदेशित केले आहे.यामध्ये स्त्रीरोग तज्ञ डॉ.कैलास गणवीर, बाल रोग तज्ञ डॉ. मनीषा बानते, क्ष - किरणशास्त्रज्ञ डॉ.आशिष असुटकर हे याठिकाणी रुजू झाले आहेत त्यामुळे ग्रामीण रुग्णालय भामरागड येथील आरोग्य सेवा अधिक गतिमान होईल असा अंदाज बांधला जातं आहे.

# सिंदी रेल्वे येथे चणा खरेदीचा शुभारंभ

## शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक वादळ वार्ता**
**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**

हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर व हरभरा (चना) पिकांची हमीभावाने खरेदी करण्यासाठी नाफेड मार्फत व राज्य कृषी पणन मंडळ यांच्या माध्यमातून बाजार समिती सिंदीच्या आवारात आज खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली. मंगळवारी समितीच्या मुख्यालयात चणा खरेदीचा शुभारंभ पार पडला.समितीचे सभापती केशरीचंद खंगारे यांच्या हस्ते कांटापूजन करून खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपसभापती प्रमोद आदमने, सदस्य गोपाल कोपरकर तसेच समितीचे सचिव तथा मुख्याधिकारी महेंद्र अशोक भांडारकर उपस्थित होते.शासनाने हरभरा खरेदीचा दर ५८७५ रुपये प्रति क्विंटल हमीभाव निश्चित केला असून नाफेड च्या निकषांनुसार खरेदी करण्यात येत आहे. उद्घाटन प्रसंगी कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. देऊळगाव येथील विठ्ठल वैद्य (४० क्विंटल), अविनाश कांबळी (४० क्विंटल), श्याम रामदास भुते (४० क्विंटल), दिनेश बोंगाडे (११ क्विंटल) तसेच अरुण



गोंडगे (२८ क्विंटल) यांनी आपला हरभरा विक्रीसाठी आणला होता.सर्व उपस्थित शेतकऱ्यांनी या प्रक्रियेचे स्वागत केले. चणा विक्रीसाठी आता खरेदी-विक्री संस्थेत नव्हे तर बाजार समितीच्या कार्यालयात नोंदणी करावी लागणार असल्याची माहिती सचिव भांडारकर यांनी यावेळी दिली. उद्घाटन प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते संबंधित शेतकऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.दरम्यान, शासकीय हमीभावाने खरेदीसाठी हरभरा नोंदणी प्रक्रिया दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत सुरू असून शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह समिती कार्यालयात नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीमार्फत करण्यात आले आहे.

# तळोद्यात मृत्यूचा सापळा! ११ के.व्ही. हायटेंशन लाईन तात्काळ हटवा; 'संत काशिबा गुरव प्रतिष्ठान' आक्रमक

## प्रशासनाला ७ दिवसांचा अल्टिमेटम; रहिवासी भागात हायटेंशन लाईनमुळे नागरिकांचा जीव टांगणीला!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील रहिवासी भागात असलेल्या ११ के.व्ही. हायटेंशन वीजवाहिनीमुळे नागरिकांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. समस्या तुमच्या - समाधान आमचे हे ब्रीदवाक्य घेऊन सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या 'संत काशिबा गुरव प्रतिष्ठान'ने या गंभीर प्रश्नी आता आक्रमक पवित्रा घेतला असून, ही वीजवाहिनी तात्काळ स्थलांतरित करण्याची ठाम मागणी केली आहे.शहरातील शिवराम नगर, विमल नगर आणि श्रेयस कॉलनी या परिसरातून ही ११ के.व्ही. उच्चदाब वीजवाहिनी गेलेली आहे. विशेष म्हणजे ही लाईन साधारण ५० ते ६० वर्षांपूर्वीची आहे. ज्या काळात ही लाईन टाकली गेली, तेव्हा हा संपूर्ण परिसर शेतीचा होता. मात्र, काळाच्या ओघात येथे मोठी नागरी वस्ती वाढली आणि आता ही जीवघेणी लाईन थेट नागरिकांच्या घरांच्या छतावरून आणि बाल्कनीच्या जवळून जात आहे.

संत काशिबा गुरव प्रतिष्ठानने वीज वितरण कंपनीला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, इलेक्ट्रिक सिटी ॲक्ट २००३ आणि सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ऑथॉरिटी च्या सुरक्षा नियमांनुसार, उच्चदाब वीजवाहिन्या आणि लोकवस्ती यामध्ये ठराविक सुरक्षित अंतर असणे अनिवार्य आहे. मात्र, येथे या नियमांना केराची टोपली दाखवण्यात आली असून, यामुळे कोणत्याही क्षणी मोठी जीवित किंवा वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कॉलनीमधील ही धोकादायक लाईन काढून ती मुख्य रस्त्याच्या बायपासने नेण्यात यावी.संबंधित विभागाने तात्काळ या भागाची तांत्रिक पाहणी करावी.

**प्रशासकीय हालचाली**

या संदर्भात (महावितरण) च्या उपकार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदन देण्यात आले असून, याच्या प्रती मुख्याधिकारी (नगरपरिषद तळोदा) आणि जिल्हाधिकारी (नंदुरबार) यांनाही पाठव



**प्रशासनाने यावर काय कार्यवाही केली, याचा लेखी खुलासा ७ दिवसांत द्यावा.**

नागरिकांच्या सुरक्षेचा हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. ५० वर्षांपूर्वीची परिस्थिती आणि आजची लोकवस्ती यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. जर ७ दिवसांत योग्य कार्यवाही झाली नाही, तर आम्ही वरिष्ठ स्तरावर तक्रार करून तीव्र लढा उभारू.
- संत काशिबा गुरव प्रतिष्ठान, तळोदा.

# बापाचं काळीज: मुलासाठी बापाचं देणं कधीच फिटत नाही!

## बीड येथील रेणू हॉस्पिटलचे संचालक डॉ.सुरेश मुंडे यांनी मांडले भावूक विचार!

दैनिक वादळ वार्ता
**प्रकाश मुंडे । केज**

एक बाप आपल्या मुलासाठी आयुष्यभर झटत असतो, स्वतःच्या सुखाचा त्याग करून मुलाच्या भविष्यासाठी पाया रचत असतो. पण मुलासाठी कितीही केलं, तरी बापाचं मन कधीच भरत नाही आणि मुलासाठी त्याचं देणं कधीच पुरत नाही, असे हृदयस्पर्शी उद्गार बीड येथील प्रख्यात रेणू हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुरेश मुंडे यांनी काढले.

पितृत्व आणि मुलाप्रती असलेल्या कर्तव्यावर भाष्य करताना डॉ. मुंडे यांनी पितृत्वाच्या एका वेगळ्या पैलूवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, समाजात आईच्या मायेबद्दल खूप बोलले जाते, पण बापाचा संघर्ष अनेकदा पडद्यामागेच राहतो. बाप हा नारळासारखा असतो, जो बाहेरून कठीण असला तरी आतून मुलांच्या प्रगतीसाठी अत्यंत हळवा



असतो.

**बापाचा संघर्ष अन् मुलाचं भविष्य**

डॉ. मुंडे पुढे म्हणाले की, आजच्या धावपळीच्या युगात मुले मोठी होतात, शिकतात, स्वतःच्या पायावर उभी राहतात. पण एक बाप म्हणून त्याला नेहमीच वाटत राहतं की आपल्या मुलासाठी आपण अजून काहीतरी करायला हवं होतं. मुलाला जगातील सर्व सुखसोयी मिळाव्यात, ही जिद्द बापाला शेवटच्या श्वासापर्यंत स्वस्थ बसू देत नाही.

**डॉक्टरांचा सल्ला: संवाद जपा**

केवळ वैद्यकीय सेवाच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व म्हणून डॉ. सुरेश मुंडे यांची ओळख आहे. याच निमित्ताने त्यांनी तरुण पिढीलाही आवाहन केले की, तुमचा बाप तुमच्यासाठी जे काही करतो, त्यामागे त्याचे अफाट कष्ट असतात. मुलांनीही आपल्या वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांच्याशी प्रेमाचा संवाद राखणे हीच त्यांच्यासाठी खरी गुरुदक्षिणा ठरेल.

रेणू हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णसेवा करताना अनेकदा कौटुंबिक नातेसंबंधांचे विविध पदर पाहायला मिळतात, त्या अनुभवातूनच हे विचार मांडल्याचे डॉ. सुरेश मुंडे यांनी नमूद केले. त्यांच्या या विधानाची सध्या बीडच्या सामाजिक वर्तुळात मोठी चर्चा होत असून, अनेकांनी या भावूक विचारांचे स्वागत केले आहे.

# पात्रुड नगरीत १९ वर्षांची भक्ती परंपरा; गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अखंड हरिनाम सप्ताहाचा जागर

## नर्मदा परिक्रमा पूर्ण श्री ह.भ.प.भगवान बाबा महाराज यांचे सप्ताहाला मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पात्रुड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हिंदू नववर्ष म्हणजेच गुढीपाडव्याचे औचित्य साधून १९ व्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन (नर्मदा परिक्रमा पूर्ण श्री ह.भ.प.भगवानबाबा महाराज पात्रुडकर) यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले आहे. येत्या १९ तारखेपासून या भक्ती सोहळ्याला प्रारंभ होत असून, पात्रुड नगरीत चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या १९ वर्षांपासून पात्रुड ग्रामस्थांनी ही आध्यात्मिक परंपरा अत्यंत निष्ठेने आणि एकजुटीने जपली आहे. १९ व्या वर्षात पदार्पण करणारा हा सोहळा यावर्षी अधिक भव्य स्वरूपात साजरा होत असून, यानिमित्ताने संपूर्ण गावात स्वच्छतेची मोहीम आणि मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.



**धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी**

सप्ताहाच्या कालावधीत दररोज पहाटे ३ ते ५ काकडा भजन, सकाळी ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, १२ ते १ गाथा भजन, २ ते ५ श्री भागवत कथा, कथा प्रवक्त्या (श्री ह भ प ज्ञानेश्वरीताई बागुल नाशिक) यांच्या अमृतमय वाणीतून पार पडणार आहे.५:३० ते ६:३० हरिपाठ, रात्री ८ ते १० या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी गावात 'भक्तीची गुढी' उभारून आणि मंगल कलश पूजनाने या सोहळ्याचा श्रीगणेशा होईल.१९ वर्षांच्या या प्रदीर्घ परंपरेमुळे पात्रुडसह पंचक्रोशीतील भाविकांमध्ये या सप्ताहाबद्दल मोठी श्रद्धा आहे. सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने होऊन त्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आमच्या पूर्वजांनी सुरू केलेली ही १९ वर्षांची परंपरा पात्रुडच्या वैभवात भर घालणारी आहे. तरी सर्व भाविकांनी या मंगलमय सोहळ्याचा आणि कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सप्ताह कमिटी व समस्त पात्रुड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्याची दखल

## श्रीमती पाचणकर सुनंदा यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मनुरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील कर्तव्यदक्ष व उपक्रमशील शिक्षिका श्रीमती पाचणकर सुनंदा शिवाजीराव यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याबद्दल ध्येय एज्युकेशन फाउंडेशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५' जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी तसेच त्यांचा बौद्धिक आणि सर्वांगीण विकास व्हावा यासाठी पाचणकर यांनी सातत्याने विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवले आहेत. आधुनिक अध्यापन पद्धतींचा प्रभावी वापर, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, तसेच मूल्याधिष्ठित शिक्षण यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक



विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला आहे.

शाळा आणि समाज यांच्यात सुसंवाद निर्माण करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले आहेत. अध्यापनातील प्रामाणिकपणा, विद्यार्थ्यांप्रती असलेली आपुलकी आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यामुळे त्या विद्यार्थी, पालक आणि सहकारी शिक्षकांमध्ये आदराचे स्थान मिळवण्यात यशस्वी ठरल्या आहेत.त्यांच्या या कार्याची दखल घेत ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष श्री. सुदाम विठ्ठल शेंडगे यांनी हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे.या सन्मानामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांकडून श्रीमती पाचणकर सुनंदा शिवाजीराव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रयागबाई मुळे यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील शृंगारवाडी येथील रहिवासी असलेल्या प्रयागबाई आबासाहेब मुळे वय ९० वर्षे यांचे दि. १७ मार्च २०२६ रोजी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पार्थिव देहावर दि. १८ मार्च २०२६ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परियावर आहे. दि. २० मार्च रोजी त्यांचा सावडण्याचा कार्यक्रम होणार आहे.बाजार समीतीचे कोषपाल मिनानाथ मुळे यांच्या मातोश्री होत.


# नवोदय प्रवेश परीक्षेत माजलगावची सुहृदा कुलकर्णी जिल्ह्यात अव्वल

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत माजलगाव येथील कु. सुहृदा सारंग कुलकर्णी हिने ९८.७५ टक्के गुण मिळवत बीड जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे सर्वत्र कौतुक होत आहे.नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा ही गुणवत्ता तपासणारी अत्यंत कठीण व महत्त्वाची परीक्षा मानली जाते. या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत सुहृदाने आपली बुद्धिमत्ता व मेहनत सिद्ध केली आहे. ती माजलगाव येथील प्रसिद्ध डॉक्टर सारंग कुलकर्णी यांची कन्या आहे.

सुहृदाच्या यशामागे तिच्या आई-वडिलांचे तसेच शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. याशिवाय मनीषा जाधव व डॉ. आर्यन जाधव यांचे तिला विशेष मार्गदर्शन मिळाले.

तिच्या या यशाबद्दल डॉ. आर्यन जाधव व प्रा.डॉ. सुदर्शन स्वामी यांच्या हस्ते सुहृदाचा सत्कार



करण्यात आला. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, भविष्यातही ती यशाची परंपरा कायम ठेवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.सुहृदाच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# स्वराज्य संकल्पक शहाजी राजे भोसले व मल्हारराव होळकर महान सेनानी होते-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक १८ मार्च २०२६ रोजी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची जयंती कथाकथन, ग्रंथवाचन,ग्रंथप्रदर्शन इत्यादी सांस्कृतीक कार्यक्रम घेवून साजरी करण्यात आली. स्वराज्याची संकल्पना शहाजीराजे भोसले यांनी मांडली.म्हणून शहाजी राजे भोसले स्वराज्य संकल्पक व महान सेनानी होते असे प्रतिपादन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते,प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.शहाजीराजे भोसले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्रथम पुजन व वंदन करण्यात आले.यावेळी कथाकथन,ग्रंथवाचन, ग्रंथप्रदर्शन आदी कार्यक्रम घेण्यात आले.



कथाकथन शिवम गायकवाड,लक्ष्मी चौरे, शिवराज पवार,आनंद गायकवाड यांनी केले. ग्रंथवाचन अथर्व गायकवाड,शौर्य गायकवाड,सुशांत सौदागर,शिवम गायकवाड यांनी केले. ग्रंथ प्रदर्शनात आनंद गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,कृष्णा गायकवाड,वेदिका गायकवाड,सोहम वैरागे, ए.बी.गायकवाड,भक्ती गायकवाड यांच्यासह वाचक,हितचिंतक, विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

दिनांक १६ मार्च २०२६ रोजी महाराजा मल्हारराव होळकर जयंती परिसंवाद व चर्चासत्र घेवून साजरी करण्यात आली.सर्व प्रथम मल्हाररावहोळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.

परिसंवादात माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, वेदिकागायकवाड यांनी सहभागी होत विचार मांडले.तर चर्चासत्रात आनंद भैय्या गायकवाड,ए.बी. गायकवाड, वेदिका गायकवाड,सुशांत सौदागर, शिवतेज पवार, लक्ष्मी चौरे यांनी सहभाग घेत विचार मांडले. अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.मल्हारराव होळकर हे थोर सेनानी होते असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक,सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077